**अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील नव्याने १००% अनुदानावर आलेली विद्याशाखा/तुकडी/ विषय याचा खर्च बांधीलकी खर्चाखाली समावेश करण्याबाबत.**

**व्ही.एन. पाटील विधी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक : अर्थसं २०२५/प्र.क्र.१४०/ई-१२२५६५२/मशि-३,**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- ०४ जून, २०२६.

**संदर्भ** : शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक - न्यायाप्र-२०२४/प्र.क्र.२५ /इ-९१४७८७/मशि-४, दिनांक ३.२.२०२५

**प्रस्तावना :**

संदर्भाधिन दिनांक ३.२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये नवलभाऊ प्रतिष्ठाण, नवलनगर, धुळे संचलित व्ही.एन. पाटील विधी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर या महाविद्यालयास अनुदानावर आणण्यास अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन सदर महाविद्यालयातील ३ वर्षीय व ५ वर्षीय विधी अभ्यासक्रमासाठी अनुज्ञेय होणाऱ्या ०८ शिक्षकीय व ०८ शिक्षकेतर अशा एकूण १६ पदांच्या वेतनाचा बांधिलकी खर्चाखाली समावेश करण्यासाठी व संदर्भीय शासन निर्णयात नमूद दिनांकापासून भरलेल्या पदांचे थकीत वेतन अदायगीसाठी येणारा खर्च विधानमंडळाच्या निदर्शनास आणण्याकरिता डिसेंबर,२०२५ च्या हिवाळी अधिवेशनात लाक्षणिक पुरवणी मागणी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर लाक्षणिक पुरवणी मागणी मान्य झाली असून या खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :

संदर्भीय शासन निर्णयाद्वारे नवलभाऊ प्रतिष्ठाण, नवलनगर, धुळे संचलित व्ही.एन. पाटील विधी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर या महाविद्यालयातील ३ वर्षीय व ५ वर्षीय विधी अभ्यासक्रमासाठी अनुज्ञेय होणाऱ्या ०८ शिक्षकीय व ०८ शिक्षकेतर अशा एकूण १६ पदांच्या वेतनाचा बांधिलकी खर्चाखाली समावेश करण्यास पुढील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे. सदर पदांच्या वेतन व भत्त्याचा खर्च संदर्भाधीन शासन निर्णयात नमूद केल्यानुसार दिनांक १८.०७.२०१७ पासून मान्य खर्चाच्या २५%, दिनांक १८.०७.२०१८ पासून मान्य खर्चाच्या ५०%, दिनांक १८.०७.२०१९ पासून मान्य खर्चाच्या ७५% व दिनांक १८.०७.२०२० पासून मान्य खर्चाच्या १००% यांप्रमाणे अनुज्ञेय करण्यात येत आहे.

**अटी :-**

१. वेतन अदा करण्यापूर्वी संदर्भीय दि.३.२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्तींचे पालन करुन तद्नंतर वेतन अनुदान अदा करावे.

२. संबंधित विभागीय सहसंचालक यांनी संदर्भीय शासन निर्णयातील निकष न तपासताच वेतन अदा केल्याचे आढळल्यास त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी.
३. रिक्त पदे भरण्याकरीता शासनाची विहित मार्गाने मान्यता घेण्यात यावी. त्याशिवाय रिक्त पदे भरण्यात येऊ नये.
४. महाविद्यालयास विद्यापीठाने दिलेल्या प्रथम संलग्निकरणात अंतर्भूत जे अभ्यासक्रम/विषय/तुकडी सद्यस्थितीत सुरू आहेत, त्यांनाच अनुदान देय राहील.
५. अनुदान वितरीत करताना शासनाने वेळोवेळी दिलेल्या अटी व शर्तींचे पालन संस्था पूर्ण करीत असल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संचालकांची राहील.
६. निधी वितरीत करताना विहित कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात येईल.

२. या बाबींवर होणारा खर्च "मागणी क्र.डब्लू-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ०३ विद्यापीठीय व उच्च शिक्षण १०४ अशासकीय महाविद्यालयांना व संस्थांना सहाय्य (०१) अशासकीय महाविद्यालयांना सहाय्य (०१)(०१) अशासकीय कला,विज्ञान,वाणिज्य व विधी महाविद्यालयांना अनुदाने (२२०२ ०८७२) - ३६ सहाय्यक अनुदाने (वेतन)" या लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर आदेश नस्ती क्र. पुरक-२०२४/प्र.क्र.१८१/ई- १२२५६५२/मशि-३ यावरील वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.४१/व्यय-५, दि.२०/०२/२०२६ अन्वये प्राप्त मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६०४१२५४२०५३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=fabb29d28cdbcbe5c9eed052cb38b8cb567068a0090e237f095c6e50a52a6cf5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D96FF33E8AF31F745D84F3411F94D896382FAA82659B10108672887A87D6FC7C, cn=ASHOK SHANKAR MANDE
Date: 2026.06.04 12:55:49 +05'30'

**(अशोक मांडे)**

**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.अपर मुख्य सचिव ( उच्च व तंत्र शिक्षण), मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. सह संचालक, उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर.
६. महालेखापाल ( लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
७. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, छत्रपती संभाजीनगर.
९. प्राचार्य, नवलभाऊ प्रतिष्ठाण, नवलनगर, धुळे संचलित व्ही.एन. पाटील विधी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर
१०. कार्यासन साशि-१/मशि-४, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. निवड नस्ती, मशि-३, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.